# निष्कर्ष

१) आप्पासाहेब खोत यांची कथा समकालीन कथा लेखकांपेक्षा आशय विषय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने पूर्णत: वेगळी आहे.

२) आप्पासाहेब खोत हे जीवंत लेखक आहेत. त्यांची ग्रामीण कथा व्यक्तीप्रधान आहे. ग्रामीण भागातील जनजीवन, संस्कृती, चाली-रिती नाती-गोती, परंपरा, सण-उत्सव दारिद्र्याशी झुंज देणारी माणसे ही खोतांच्या कथेतून जीवंत वाटतात.

३) बदलत्या खेड्याच्या, समाजाच्या, औद्योगिकीकरणाच्या सामान्य कष्टकरी शेतकरी समाजाच्या वलयाभोवतीच त्यांच साहित्य गुंफत आहे.

४) ग्रामीण विधवा स्त्रीच जीवघेण दु:ख चित्रीत करण हा खोत यांच्या कथालेखनाचा वेगळाच पिंड आहे.

५) विषयाची विविधता हा खोत यांच्या लेखनाचा विशेष पैलू आहे. अंधश्रद्धा, एड्सपर प्रबोधनात्मक लेखन, विधवा विवाह, प्राणी जीवन इ. असे कितीतरी विषय खोतांच्या कथेत आले आहेत.

६) साहित्यिक नजरेने जे पाहिले, अनुभवले त्यांच्या संस्कारक्षम मनाला जे भावले तेच त्यांच्या साहित्याचे विषय बनले.

७) बदलत्या समाजाच वास्तव दर्शन, माया, प्रेम, ममतेचा ओलावा, कर्तव्याला जगणारी माणसे खोतांच्या कथेमधून साकारतात.

८) आप्पासाहेब खोत यांचा जन्म ग्रामीण भागात कष्टकरी, एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाल्याने अत्यंत हालाखिच्या परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. व ते आज ज्युनिअर कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करत आहेत.

९) समाजप्रबोधनाचा हेतू मनात ठेवून त्यांच साहित्य आकाराला आल आहे. त्याबरोबरच शेती मळ्यात, कामकरी, कष्टकरी माणसांबरोबर वावरल्याने हाच अनुभव त्यांच्या मनाला स्पर्श करणारा ठरला हेच त्यांच्या साहित्याचे विषय बनले.

१०) आजच्या ग्रामीण जीवनातील अनुभव अत्यंत कसदारपणे मांडणे आणि समाजातील विसंगतीवर बोट ठेवणे हेच त्यांच्या कथालेखनाचे विशेष यातुनच खोत यांच्या वाङ्मयीन कर्तृत्व व व्यक्तीमत्व घडत गेल्याचे दिसते.

११) जुन्याला कवटाळून न बसता नाविन्याचा ध्यास घेणाऱ्या, नवसंदेश देणाऱ्या खोतांच्या कथा आहेत.

१२) वडीलांबरोबर शेणाघाणीच काम करत असताना ते गोठ्यातील जनावरांबरोबर बोलले त्यांच्या डोळ्यातील भाव त्यांना दिसले. हेच त्यांच्या साहित्यातून फुलत गेले.

१३) जाखले सारख्या खेडेगावात जन्मलेल्या आप्पांना वाचनाचा व्यासंग विद्यार्थीदशेपासुनच होता. त्यातच ग्रामीण माणूस जवळून अनुभवला. घरच्या शेती मळ्यातील मातीशी वात्सल्याचा संबंध आल्याने खोतांच्या संवेदनाक्षम मनातून साहित्य सहजा-सहजी घडत गेले. उमलत्या कळीप्रमाणे फुलत गेले.

१४) आजच्या खेड्यात माणूसकी हरवली आहे. आर्धी चतकोर वाटुन खाणारा माणूस आज दुसऱ्याची भाकरी हिसकावून घेऊ लागला. सख्खा भाऊ पक्का वैरी झाला, शिकलेला माणूस शहरात राहु लागला. कष्टकरी आई-वडिलांना विसरला. माणूस माणसाला परका झाला. याच दारुण चित्रण खोतांच्या साहित्यातून अवतरताना दिसते.

१५) दुसऱ्याच दु:ख पाहुन आपलही मन दु:खान भरुन जाणारा लेखक म्हणजेच जातीवंत लेखक होय. हेच त्यांच्या साहित्यातून जाणवते.

१६) साहित्य लेखनाच्या प्रांतात खोत यांना शंकर पाटील, रा. र. बोराडे, चंद्रकुमार नलगे, राजन गवस, वामन होवाळ या सारख्या लेखकांची प्रेरणा मिळाल्याने त्यांच साहित्य फुलत गेले. ते घडत गेले.

१७) स्वार्थी माणसांच बरबटलेल मन मानवी नातीच त्यांच्या लेखनाचे स्फूर्तीस्थान आहे.

१८) आशयात अविष्कार आणि अविष्कारात आशय इतकी एकरुपता आभावानेच आजच्या ग्रामीण कथालेखनात आढळते ती खोतांच्या कथांमधून सहज प्रत्ययाला येते.

१९) ग्रामीण भाषा आणि नागरभाषा यांचे मिश्रण खोतांनी कथा उभारणीत केले आहे.

२०) सहजसंवादाने कथा अधिकच परिणामकारक ठरल्या आहेत. त्यांच्या बहुतेक कथा या संवादातून आकार होतात.

******

# ३) आप्पासाहेब खोत यांच्या समग्र साहित्याची सूची.

**प्रकाशित साहित्य :-**

**१) कथासंग्रह –**

१) गवनेर : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. १९९१

२) महापूर : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. १९९६

३) रानगंगा : मॅजिक प्रकाशन, पुणे. १९९९

४) कळवंड : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. २०००

५) माती आणि कागुद : शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर. २००५

६) मरणादारी : निर्मोही प्रकाशन, पुणे. २००५

## २) कादंबरी –

१) पळसफूल : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. १९९२

२) गावपांढर : मॅजिक प्रकाशन, पुणे. १९९९

३) गावपांढरीच्या वाटेवर : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर. २०००

४) घरपण : निर्मोही प्रकाशन, पुणे. २००४

**३) चरित्र – बालवाङ्मय**

देवमाणूस : कर्मवीर भाऊराव पाटील : मॅजिक प्रकाशन, पुणे. २०००

**४) कथाकथनाच्या कॅसेट –**

१) मरणादारी : अरुण कचरे प्रस्तुत : कुणाल म्युझिक कंपनी, मुंबई.

२) कोंबडी – गवनेर : अरुण कचरे प्रस्तुत : कुणाल म्युझिक कंपनी, मुंबई.

******

# ४) आप्पासाहेब खोत यांना लाभलेले मानसन्मान.

१) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे - ग. ल. ठोकळ पुरस्कार.

२) राज्यस्तरिय विठ्ठलाई साहित्य पुरस्कार महापूर या कथासंग्रहास.

३) महाराष्ट्रशासनाचा १९९९-२००० चा रानगंगा या कथासंग्रहास बी. रघुनाथ पुरस्कार, औरंगाबाद येथे डॉ. य. मु. पठाण, रा. र. बोराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत.

४) म. सा. प. पुणे दलित कथास्पर्धेचा पुरस्कार, दसऱ्याची कडाकणी या कथेस.

५) आचार्य अत्रे पुरस्कार सासवड १९९९ - प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते.

६) राधानगरी साहित्य गौरव पुरस्कार.

७) उत्कृष्ट कथाकथनकार महाराष्ट्र राज्य कामगार संघटना - कल्याण-मुंबई यांचा १९९९ डॉ. हेमंत देशमुख कामगार मंत्री यांच्या हस्ते अकोला साहित्य संमेलनात प्रदान.

८) दानशूर बंडा गोपाळा मुकादम साहित्य पुरस्कार, राज्यस्तरीय पुरस्कार घरपण या कादंबरीस.

९) सांगली व आकाशवाणी केंद्रावरुन अनेकवेळा कथाकथनाचे कार्यक्रम.

१०) गाव पांढरीच्या वाटेवर या कादंबीचे संजय कुलकर्णी यांनी आकाशवाणी सांगली केंद्रावरुन क्रमश: वाचन केले आहे.

११) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन परळी वैजनाथ जि. बिड, पुणे व औरंगाबाद येथे कथा-कथनासाठी निमंत्रित.

१२) महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ साहित्य संमेलन कोल्हापूर, मुंबई व अकोला येथे कथा कथनासाठी निमंत्रित.

१३) कादरगा, ता. चिक्कोडी, जि. बेळगाव येथील ८ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष २००३.

१४) आचार्य अत्रे साहित्य प्रतिष्ठान सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्या मार्फत ५ वे मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष १९९९

१५) शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात काही निवडक कथांचा समावेश - भोग हि कथा पाठ्यपुस्तक ८ वी २००६ मध्ये समावेश.

१६) २००७ पर्यंत २५०० च्या वर कथाकथनाचे यशस्वी प्रयोग केले आहेत.

********

# ५) संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) | ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्य : | आनंद यादव |
| २) | ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध : | डॉ. नागनाथ कोतापल्ले<br>प्रथमावृत्ती १९८५ |
| ३) | ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास : | संपादक चंद्रकुमार नलगे<br>प्रथमावृत्ती १९९६ |
| ४) | ग्रामीण साहित्य एक चिंतन : | द. ता. भोसले<br>आवृत्ती १९८१ |
| ५) | ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव : | आनंद यादव<br>प्रथम आवृत्ती १९८१ |
| ६) | ग्रामसंस्कृती : | आनंद यादव<br>आवृत्ती २००० |
| ७) | ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही : | संपादक वासुदेव मुलाटे |
| ८) | शेतकऱ्याचा आसुड : | संपादन आणि प्रस्तावना<br>डॉ. नागनाथ कोतापल्ले २००१ |
| ९) | महात्मा फुले (पस्तावना) : | य.दी. फडके<br>प्रथमावृत्ती १९६९ |
| १०) | सह्याद्रीचे वारे : | यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक<br>भाषणांचा संग्रह प्रथामवृत्ती १९६२ |
| ११) | साहित्य चिंतन आणि शोध : | गंगंधर गाडगीळ<br>प्रथमावृत्ती १९९६ |
| १२) | गावगाडा : | श्री. ना. अत्रे प्रथमावृत्ती १९१५ |

| | | |
|---|---|---|
| १३) | प्रदशिणा खंड पहिला व दुसरा : | म. ना. अदवंत<br>आवृत्ती १९९३ |
| १४) | टीकाविवेक : | क्षिरसागर |
| १५) | खानदेशातील वहिवाङ्मय : | सौ. शालिनी नारखेडे |
| १६) | पिराजी पाटील : | ले. धर्नुधारी, सं. डॉ. आनंद यादव<br>स्नेहवर्धन प्रकाशन आवृत्ती १९०३ |
| १७) | काळी आई : | व्यकटेश माडगुळकर,<br>उत्कर्ष प्रकाशन पुणे<br>तिसरी आवृत्ती -१९८२ |
| १८) | बंधारा : | शंकर पाटील - इंद्रायणी साहित्य<br>प्रकाशन पुणे - प्रथमावृत्ती १९८६ |
| १९) | वाटा आडवाटा : | वामन होवाळ - स्वयंदीप प्रकाशन<br>आवृत्ती १९८८ |
| २०) | आभाळदानी : | नामदेव माळी-विवेक प्रकाशन<br>वारणानगर - प्रथमावृत्ती १९९२ |
| २१) | मातीखालची माती : | आनंद यादव-मेहता पब्लिशिंग हाऊस<br>१९६५ |
| २२) | माळावरची मैना : | आनंद यादव-मेहता पब्लिशिंग हाऊस<br>१९८५ |
| २३) | आक्रित : | चंद्रकुमार नलगे<br>प्रचार प्रकाशन, कोल्हापूर |
| २४) | वावरी शेंग : | शंकर पाटील : इंद्रायणी साहित्य पुणे<br>प्रथमावृत्ती ड्ढ १९६३ |

२५) गब्रु : महादेव मोरे – सुयोग प्रकाशन, पुणे
प्रथमावृत्ती १९९४

२६) ग्रामीण साहित्य स्वरूप व दिशा : डॉ. वासुदेव मुलाटे,
कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती – १९९४

२७) मराठी प्रादेशिक वाङ्मय : डॉ. मा. ना. कागणे
गोदावरी प्रकाशन पुणे–१९९६

२८) ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास: डॉ. वासुदेव मुलाटे
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद
१९९२

२९) फेसाटी : प्रा. आप्पासाहेब खोत
अजब पब्लिकेशन कोल्हापूर
प्रथमावृत्ती – २००६

३०) माती आणि कागुद : आप्पासाहेब खोत
शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर
प्रथामावृत्ती ड्ढ २००५

३१) गावपांढर : प्रा. आप्पासाहेब खोत,
मॅजिक प्रकाशन, पुणे–१९९९

३२) गावपांढरीच्या वाटेवर : प्रा. आप्पासाहेब खोत,
प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर २०००

३३) गवनेर : आप्पासाहेब खोत,
प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर–१९९१

३४) पळसफुल : प्रा. आप्पासाहेब खोत,
प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर–१९९२

३५) महापूर : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर-१९९६

३६) रानगंगा : प्रा. आप्पासाहेब खोत,
मॅजिक प्रकाशन, पुणे-१९९९

३७) कळवंड : प्रा. आप्पासाहेब खोत,
प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर-२०००


*****************